RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ८, अंक १८] बुधवार, मार्च ९, २०२२/फाल्गुन १८, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४१**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मंत्रालय, २ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०००३२, दिनांक ९ मार्च २०२२.

### अधिसूचना

**मोटार वाहन नियम, १९८८.**

क्रमांक डब्ल्युपी-०२२१/प्र.क्र.११/परि-२.– ज्याअर्थी जनहित याचिका (एल) क्र. ९७७५/२०२० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०७ मार्च २०२२ रोजी मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) च्या कलम ९३ च्या उपकलम (१) नुसार राज्यातील प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांना समुच्चयकांना अनुज्ञप्ती जारी करण्यासाठी अनुज्ञप्ती प्राधिकारी म्हणून व कलम ८९ च्या प्रयोजनाकरिता राज्य परिवहन अपीलीय न्यायाधिकरण यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्याबाबत अधिसूचना जारी करावी म्हणून राज्य शासनास निर्देश दिले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास कलम ९३ च्या पोट-कलम (१) अन्वये अनुज्ञप्ती जारी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांस व राज्य परिवहन अपिलीय न्यायाधिकरण यांना अपिलीय प्राधिकारी करणे उचित वाटत आहे ;

त्याअर्थी आता, मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ९३ च्या पोट-कलम (१) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांना समुच्चयकांना अनुज्ञप्ती जारी करण्यासाठी सक्षम

प्राधिकारी म्हणून आणि कलम ९३ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य परिवहन अपिलीय न्यायाधिकरण (The State Transport Appellate Tribunal) यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून खालील शर्तींच्या अधीन राहून प्राधिकृत करण्यात येत आहे :—

(*i*) समुच्चयक यांना अनुज्ञप्तीसाठी दिनांक १६ मार्च २०२२ पर्यंत अथवा त्यापूर्वी अर्ज करणे आवश्यक असेल.

(*ii*) जर समुच्चयकाने उक्त दिनांकापर्यंत अथवा त्यापूर्वी अर्ज केला नसेल किंवा अर्ज सक्षम प्राधिकाराने नाकारला असेल तर अशा समुच्चयकास महाराष्ट्र राज्यात जोपर्यंत तो उचित अनुज्ञप्ती प्राप्त करणार नाही तोपर्यंत पुढील संचलन करता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र होळकर** ,
शासनाचे सह सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 9th March 2022.

*NOTIFICATION*

Motor Vehicles Act, 1988.

No.WP-0221/C.R.11/TR-2.– Whereas, the Hon'ble High Court of Judicature at Bombay, *vide* its order dated the 7th March 2022, in Public Interest Litigation (L) No. 9775 of 2020, directed the State Government to issue notification to empower Regional Transport Authority in the State of Maharashtra to act as the Licencing Authority for grant of license to aggregator under sub-section (*1*) of section 93 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988) and the State Transport Appellate Tribunal as Appellate Authority for the purposes of section 89 of the said Act;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to empower the Regional Transport Authority as Competent Authority for grant of license under sub-section (*1*) of section 93 of the said Act and the State Transport Appellate Tribunal as Appellate Authority for the said purpose;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 93 of the Motor Vehicles Act, 1988, the Government of Maharashtra hereby empowers all the Regional Transport Authority in the State of Maharashtra as Competent Authority and the State Transport Appellate Tribunal as Appellate Authority for the purposes of issuing license to an aggregator under sub-section (*1*) of section 93 of the said Act, subject to the following conditions :–

(*i*) An aggregator shall apply for license on or before the 16th March 2022.

(*ii*) If an aggregator does not apply for license on or before the said date or the application is rejected by the competent authority, an aggregator shall not be permitted to carry on operation in the State of Maharashtra till such time an appropriate license is obtained by the aggregator.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. M. HOLKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.